# नोटाबंदी : काय कमावले काय गमावले?

### १ वर्षानंतर...

- **एकूण चलना पैकी ९९ टक्के रक्कम बँकेत जमा**
- **फक्त १६,००० कोटी रुपयेच अर्थव्यवस्थेतुन हद्दपार**
- **नवीन नोटा छापायचा खर्च ३०,००० कोटी रुपये**
- नोटा बदलविण्याकरिता **बळी पडले १५० लोकं**
- विविध क्षेत्रातील **१५ लाख नोकऱ्या नष्ट**
- हजारों लघु-उद्योग बंद, त्यातील लाखों कामगार बेकार
- बांधकाम क्षेत्रात मोठी मंदी, लाखों कामगारांची उपासमार
- **आश्वासन ५० दिवसांचे पण ३६५ दिवसांनंतरही अर्थव्यवस्था पुर्वपदावर नाही**
- **काळ्या पैशावाल्या एकाही मोठ्या धेंडावर कारवाई नाही**

'त्या दिवशी' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाचशे आणि हजाराच्या नोटा चलनातून बाद केल्याची घोषणा केली होती.

लोक भाबड्या आशा बाळगून होते. "काळ्या पैशाला लगाम बसेल, महागाई कमी होईल, दहशतवाद्यांची आर्थिक रसद बंद होईल, बनावट नोटा बंद होतील, साठ वर्षांची घाण उपसण्याचं काम मोदी सरकार करत आहे," अशा प्रतिक्रिया जनता त्या वेळी व्यक्त करत होती. नोटाबंदीचे गुणगान करणाऱ्यांना 'देशभक्तीची' प्रमाणपत्रे दिली जात होती. "नोटाबंदीमुळे गरीब निर्धास्त झोपत आहेत आणि श्रीमंतांची झोप उडाली आहे." अशी आवई पंतप्रधान उठवत होते. हे दावे पुर्ण झाले? काळा पैसा हाती लागला? झोप कुणाची उडाली – श्रीमंताची की गरीबांची? ५० दिवसांनंतर लोकांचे जिवन सुरळीत झाले? खरंतं नोटाबंदीच्या नावाखाली मोदी सरकारने संपूर्ण देशाची अर्थव्यवस्थाच बड्या कंपन्यांकडे सोपवली! चला, वास्तव काय ते पाहूयात.

## • नोटाबंदीमुळे बनावट नोटा बंद झाल्या का? दहशतवाद्यांची नाकेबंदी झाली का?

सरकारचे हे दोन्ही दावे हास्यास्पद होते. रद्द झालेल्या पाचशे, हजारांच्या नोटांचे एकूण मूल्य १४.५ लाख कोटी होते. कोलकातामधील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासानुसार सुमारे ४०० कोटींचे बनावट चलन भारतात वापरात होते. म्हणजे **बनावट नोटांचे प्रमाण रद्द करण्यात आलेल्या नोटांच्या तुलनेत फक्त ०.०३ टक्के.** म्हणजे मुंगी मारण्यासाठी डोंगर पोखरणं! दुसरी बाब – बनावट नोटा छापणाऱ्यांनी नव्या नोटांचीही नक्कल सुरू केली आहे. आता पुन्हा नवीन नोटा रद्द करणार का? दुसरीकडे दहशतवाद्यांच्या आर्थिक नाड्या आवळण्याचा दावा केला जात होता. मात्र, दहशतवाद्यांना मुख्यतः इतर देश बनावट नोटा छापून पुरवतात. हे देश नव्या नोटांचीही नक्कल करू शकतात. त्याचे काय?




## • नोटाबंदीमुळे काळा पैसा संपुष्टात आला का?

लोकांची अशी समजूत असते की, काळा पैसा म्हणजे नोटांचे बेहिशेबी गठ्ठे असतात आणि ते ट्रंकांमध्ये, गादीखाली, उशांच्या अभ्र्यात किंवा जमिनीखाली दडवून ठेवलेले असतात. नोटाबंदीनंतर आता काळे पैशेवाले आपापले दडवलेले गठ्ठे बाहेर काढतील आणि बँकेत घेऊन जातील. मग प्राप्तीकर विभाग या साठेबाजांना अटक करेल. हे दावे तपासण्यापूर्वी काळा पैसा म्हणजे काय हे आधी समजून घेऊया.

काळा पैसा हा एकूण काळ्या अर्थव्यवस्थेचा अत्यंत छोटा घटक आहे. काळी अर्थव्यवस्था ही काळी प्राप्ती, काळा पैसा आणि काळी संपत्ती या तीन घटकांनी बनते. समजा एखाद्या डॉक्टरनं करचुकवेगिरी करून पैसा मिळवला तर ती त्याची काळी प्राप्ती असते. या प्राप्तीपैकी तो अत्यंत छोटी रक्कम आपल्याजवळ ठेवतो – या रक्कमेला काळा पैसा म्हणतात. कारण यातून त्यांना काहीच परतावा मिळत नाही. त्यामुळे उर्वरित रक्कम तो जमीन खरेदी, फ्लॅट, शेअर्स, सोने-दागिन्यात गुंतवतो. ही गुंतवणूक म्हणजे काळी संपत्ती. प्राप्तीकर विभागानुसार फक्त ५% काळा पैसा आहे. उर्वरित ९५% काळा पैसा साठेबाजांनी काळ्या संपत्तीत गुंतवला आहे. या संपत्तीकडे दुर्लक्ष करून फक्त ५% काळ्या पैशाच्या मागे हात धुवून लागणे किती तर्कशुद्ध होते?

नोटाबंदीच्या निर्णयामुळे चलनात असलेल्या १४.५ लाख कोटी किंमतीच्या पाचशे आणि हजाराच्या नोटा चलनातून बाद झाल्या होत्या. हा सर्वच्या सर्व काळा पैसा नव्हता. यापैकी ७५ टक्के नोटा मजुर, शेतकरी, कामगार, छोटे व्यापारी, दुकानदार हे

वापरत होते. खरंतर 'सर्जिकल स्ट्राईक' ही या सर्वसामान्य प्रामाणिक जनतेवर झाली. करबुडवे धनदांडगे आणि मुजोर कंपन्या मात्र निर्धास्त होत्या आणि आहेत. त्यांनी विविध मार्गांनी काळयाचे 'पांढरे' करुन घेतले. त्यांना काडीचाही धक्का लागलेला नाही.

## • सरकारला खरोखरंच काळ्या पैशाविरुद्ध युद्ध छेडायचं होतं का?

**नाही!** खालील तथ्यातून सिद्ध होतं:

- **स्विस बँकेतील** सर्व खातेदारांची माहिती सरकारकडे असूनदेखील सरकारकडून त्यांच्यावर काहीच कारवाई नाही.
- **पनामा पेपर्स** प्रकरणात परदेशात संपत्ती लपविणारे अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय, उद्योगपती अदानी यांच्यासह अनेक उद्योगपती, नेतेमंडळी आदी ५०० जणांची नावे जगजाहीर झाली आहेत. या धेंडांना सरकारने हातही लावलेला नाही.



- भ्रष्टाचार संपवण्याच्या बाता मारणाऱ्या सरकारने अजूनही **लोकपाल** नियुक्त केलेला नाही.
- **सत्ताधारी भाजपने स्वत: आणि इतर राजकीय पक्षांना माहितीच्या अधिकाराखाली आणलेले नाही.** गत लोकसभा निवडणुकीत ३० हजार कोटी इतका पैसा पाण्यासारखा खर्च केला गेला. यापैकी सर्वाधिक रक्कम भाजपने उधळली. हा पैसा कुठून आला हे अद्यापही भाजपनं जाहीर केलेलं नाही.
- देशातील बड्या धनदांडग्यांनी ५०० अब्ज डॉलरहून अधिक संपत्ती **करचुकवेगिरी** करून परदेशात दडविल्याची माहिती खुद्द सीबीआयच्या संचालकांनी दिली आहे. त्यावर सरकारने काहीही कारवाई केली नाही.

## • निर्लज्ज सरकार, तुघलकी कारभार!

सगळे दावे फोल ठरले असतानाही 'हा निर्णय फसला' हे मान्य करायला सरकार तयार नाही. उलट निर्लज्जपणे ८ नोव्हेंबर ला 'काळ्या पैशा विरोधी दिवस' साजरा करत परत एकदा लोकांच्या डोळ्यात धुळफेक करत आहे. पनामा पेपर्स पाठोपाठ 'पॅराडाईस पेपर्स' बाहेर आल्यावर परत शेकडो पाढरपेशे चोरांची माहिती बाहेर आली आहे. पण पनामा पेपर्स सारखे पॅराडाईज पेपर्सही रद्दीतच पडुन राहाणार हेच अनुभवावरुन समजते.

## • मग नोटाबंदीचा अट्टहास कशासाठी?

वास्तविक सरकारला भारतीय अर्थव्यवस्था बड्या कंपन्यांच्या ताब्यात द्यायची आहे. नोटा उपलब्ध नसल्याने लोकांना 'कॅशलेस' होण्याकडे ढकलले जात आते. क्रेडिट-डेबिट कार्डचा वापर, ऑनलाईन खरेदी यांना प्रोत्साहन दिलं जात आहे. **यातून छोटे दुकानदार उद्ध्वस्त होतील आणि अमेझॉन, फ्लिप्कार्ट यांसारख्या बलाढ्य कंपन्यांचा धंदा जोरात चालेल. शेतकरी उद्ध्वस्त झाल्यावर शेतीचे कंपनीकरण करता येईल. सहकारी बँकांचे खच्चीकरण करून त्या खासगी बँकांच्या घशात घालता येतील. याचसाठी नोटाबंदी आणि कॅशलेस इंडियाचा गजर सुरू केला आहे.**

ज्या देशात ६०% जनता खेड्यांमध्ये राहते, ७०% जनता रोज २० रुपयापेक्षा कमी वर जगते आणि ५०% लोकांचे बँकेत खातेच नाही, अशा देशाला कॅशलेस बनवण्याचा प्रयत्न करणे ही गोरगरिबांची केलेली क्रूर थट्टा आहे. आधीच मोदी सरकारने सत्तेत आल्यापासून शिक्षण, आरोग्य क्षेत्रावरील खर्चाला कात्री लावली आहे. आता तर गरिबांची संपूर्ण अर्थव्यवस्थाच उद्ध्वस्त केली जात आहे. मात्र दुसरीकडे श्रीमंतांच्या, कंपन्यांच्या तुंबड्या भरण्याचे काम सरकार निर्लज्जपणे करत आहे.

मित्र-मैत्रिणींनो, एका लोकशाही देशाचे नागरीक म्हणून आपल्याला प्रश्न विचारावेच लागतील. चला, विचार करूया, संघटित होऊया आणि खऱ्या अर्थाने देशात लोकशाही आणण्याचा प्रयत्न करूया!

# लोकायत

**संपर्क पत्ता:** लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४

*(या पत्त्यावर दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते. बैठकीत आपलं स्वागत आहे.)*

अलका – 9067003838 | ऋषिकेश – 9423507864 | www.lokayat.org.in | lokayat.india@gmail.com

lokayat.india | lokayat.india | @lokayat | lokayatpune | abhivyakti.pune | KafilaOfficial

हे पत्रक अलका जोशी यांनी लोकायतसाठी बुधवार, दि. ८ नोव्हेंबर २०१७ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.